## जनसंपर्क विभाग

जळगाव दिनांक १५ (प्रतिनिधी)-कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संरक्षण आणि सामाजिक शास्त्र विभागाच्या वतीने उद्या दि. १६ आणि १७ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची लष्करी नीती आणि प्रशासकीय धोरणांची आधुनिक युगातील प्रासंगिकता या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र होत आहे.

शुक्रवारी सकाळी दहा वाजता विद्यापीठाच्या सिनेट सभागृहामध्ये या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन होणार आहे.भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद नवी दिल्लीचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांचे बीजभाषण होणार असून विशेष निमंत्रित पाहुणे म्हणून सेनादलाचे ऑफिसर कमांडिंग राहुल दत्त हे उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.व्ही एल माहेश्वरी उपस्थित राहतील.

उद्घाटनानंतरच्या सत्रात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण नॅशनल सेंटर ऑफ इंटरनॅशनल सिक्युरिटी अँड डिफेन्स अनालिसिसचे माजी संचालक डॉ.श्रीकांत परांजपे हे छत्रपती शिवाजी महाराज- सर्वोत्कृष्ट सामरिक विचारवंत या विषयावर मांडणी करतील.त्यानंतर महाराष्ट्राचे माजी पोलीस महासंचालक जयंत उमराणीकर हे 'छत्रपती शिवाजी महाराज-गुप्तहेर खाते आणि सध्याच्या हेरखात्यासाठी धडे' या विषयावर बोलतील.दुपारच्या सत्रातछत्रपती शिवाजी महाराज रायगड मेमोरियल मंडळ पुण्याचे संचालक रघुजी आंग्रे हे 'छत्रपती शिवाजी महाराज भारतीय नौदलाचे पितामह शिवकाळातील नवदलाची नीती आणि त्यांचे शत्रूंवर झालेले परिणाम' या विषयावर मांडणी करणार आहेत तर दुपारी दोन सत्रांत शोधनिबंधही सादर होणार आहेत.

शनिवार दिनांक १७ फेब्रुवारी रोजी सकाळच्या सत्रात मेजर जनरल जी डी बक्षी (निवृत्त) हे 'छत्रपती शिवाजी महाराज- भारतीय लष्करी शक्तीचे पुनरुज्जीवन आणि आधुनिक काळाशी त्यांची समयोचितता' या विषयावर मांडणी करणार आहेत. भारत सरकारच्या ऐतिहासिक संशोधन मंडळाचे सदस्य विक्रमसिंग बाजी मोहिते, हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी नाशिकचे सदस्य प्रकाश पाठक, अमरावतीचे अभ्यासक प्रा. अशोक राणा, छत्रपती संभाजीनगरचे प्रा.कामाजी डक, शासनाच्या किल्ले रायगड प्राधिकरणाचे सल्लागार सुधीर थोरात, पुरातत्त्व विभाग डेक्कन कॉलेजचे डॉ. सचिन जोशी, किल्ले रायगड संवर्धन आर्किटेक्ट रायगड विकास प्राधिकरणाचे वरूण भामरे हे देखील बोलणार आहेत.विद्यापीठ अनुदान आयोगाचे सचिव डॉ. मनीष जोशी यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचा समारोप होणार आहे. या चर्चासत्रासाठी देशभरातून जवळपास २७५ प्रतिनिधींनी नोंदणी केली असून १४० वर शोधनिबंध प्राप्त झाले आहेत अशी माहिती संयोजन सचिव डॉ. तुषार रायसिंग यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव दि. १५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने दि. १८ ते २६ फेब्रुवारी या कालावधीत पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ क्रिकेट (पुरूष) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून तीन राज्यातील ६१ संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

महाराष्ट्र, गुजरात व गोवा या तीन राज्यातील ६१ क्रिकेट संघ सहभागी होतील. विद्यापीठाचे मैदान,मुळजी जेठा महाविद्यालयाचे मैदान, सावखेडा शिवारातील महेंद्र कोठारी स्पोर्टस् अकादमीचे मैदान आणि अनुभुती शाळेचे मैदान अशा चार मैदानांवर या स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धांच्या नियोजनासाठी विविध २२ समित्या कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी गठीत केल्या असून वेळोवेळी बैठका घेऊन नियोजन करण्यात आले आहे. स्पर्धेची सोडत काढण्यात आली आहे. दररोज प्रत्येक मैदानावर दोन सामने होतील. सकाळच्या सत्रात आठ ते पावणे बारा व दुपारच्या सत्रात सव्वा बारा ते सायंकाळी चार या वेळेत सामने होणार आहेत. २०:२० ओव्हरची स्पर्धा खेळवली जाणार आहे. दि. १८ रोजी दुपारी विद्यापीठाच्या मैदानावर स्पर्धेचे उद्घाटन होणार असल्याची माहिती क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील यांनी दिली.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १५ फेब्रुवारी, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता